## निवडणूक निर्णय अधिकारी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठेमहंकाळ, ता. कवठेमहंकाळ, जि. सांगली यांचे कार्यालय द्वारा विशेष लेखापरिक्षक वर्ग १ सहकारी संस्था (साखर), सांगली

२०४, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विजयनगर, सांगली मिरज रोड सांगली
E-mail ID- spladt.sugsangli१@gmail.com

**वाचले -**

१) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ व त्या खालील नियम,
२) मा.सहकार निवडणुक प्राधिकरण, सहकार मंत्रालय, दिल्ली यांचेकडील दि.३०/०७/२०२६ रोजीचा मंजूर निवडणुक कार्यक्रम
३) हरकतदार श्री.विक्रम लक्ष्मण कोळेकर रा. हिंगणगांव यांचे दि. २१/०८/२०२६ रोजीचे अर्ज

ज्या अर्थी उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठे महांकाळ ता. कवठे महांकाळ जि. सांगली या संस्थेच्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कार्यक्रम सुरु असून मंजूर निवडणुक कार्यक्रमानुसार दि. ०७/०२/२०२५ ते ११/०२/२०२५ अखेर नामनिर्देशन पत्रे दाखल करणेचा कालावधी होता.

१) नियम १९ (L) नुसार दि. ०७/०२/२०२५ ते ११/०२/२०२५ अखेर मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी वाचले क्र. २ नुसार आजरोजी दि. २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निवडणुक निर्णय अधिकारी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठे महांकाळ यांचे कार्यालयात सुरु करणेत आली.

या छाननीच्या वेळी खालील उमेदवारांबाबत श्री.विक्रम लक्ष्मण कोळेकर रा.हिंगणगांव यांनी खालील प्रमाणे १९ सदस्यांवर हरकती घेण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | अ.क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | श्री.कुमार आपासो पाटील | ११ | श्री.रमेश ज्ञानु भोसले |
| २ | श्री.मोहन निवृत्ती खोत | १२ | श्री.दिपक अच्युतराव चव्हाण |
| ३ | श्रीमती अनुराधा गणपती सगरे | १३ | श्री.जिवन वसंतराव भोसले |
| ४ | श्री.निखील संजय बनसोडे | १४ | श्री.शंतनू विजयकुमार सगरे |
| ५ | श्रीमती सुनिता अशोक कानुरे | १५ | श्री.दिपक गणपती ओलेकर |
| ६ | श्रीमती अनुराधा गणपती सगरे | १६ | श्री.बाळासाहेब रामचंद्र पाटील |
| ७ | श्री.भिमराव विठ्ठल कोळेकर | १७ | श्रीमती अनिता वियजकुमार सगरे |
| ८ | श्री.अतगोंडा रामू बंडगर | १८ | श्री.विजय पुंडलिक पाटील |
| ९ | श्री.संभाजी गजानन पाटील | १९ | श्री.भानुदास भिवा कोरे |
| १० | श्री.अशोक श्रीपती कोळेकर | | |



Scanned with OKEN Scanner

अर्जदार श्री.विक्रम लक्ष्मण कोळेकर रा.हिंगणगांव यांनी दाखल केलेले अर्जात खालील प्रमाणे हरकती घेतलेली आहे –

१. मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 104(1) आणि 104(3) अंतर्गत तसेच कलम 120 च्या उल्लंघनाबाबत हरकत :-
दि. 24/03/2026 रोजी केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था यांनी विद्यमान संचालक मंडळाला मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 104(1) आणि 104(3) अंतर्गत तसेच कलम 120 च्या उल्लंघनाबाबत स्मरणपत्र दिले होते.
हे स्मरणपत्र सांभाळायच्या वैधानिक परताव्या/रिटर्न्स वेळेत न भरल्याबद्दल होते. त्या नोटीसमध्ये स्पष्ट नमूद होते की 15 दिवसांत परतावे भरले नाहीत, तर सोसायटी कार्यरत नाही असे गृहीत धरले जाईल. तरीही विद्यमान संचालक मंडळाने त्याचे पालन केलेले नाही.

२. मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 39 च्या उल्लंघनाबाबत हरकत :-
संचालक मंडळाने त्यांच्या कार्यकाळात कलम 39 अंतर्गत आवश्यक असलेली वार्षिक सर्वसाधारण सभा 6 महिन्यांपेक्षा जास्त काळ घेतलेली नाही.
मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या कार्यकाळानंतरही सभा सुरू ठेवण्याचे निर्देश दिले होते, तरीही त्यांनी त्याचे पालन केले नाही.
त्यांच्या गैरव्यवस्थापन आणि भ्रष्टाचारामुळे सोसायटीची मालमत्ता सारफेसी कायद्यानुसार विकण्यात आली.

३. संस्थेचे सभासद असलेली नानासाहेब सगरे महांकाली साखर कारखाना कामगार पतसंस्था यांचे देणे थकवलेबाबत कारवाई झाली असलेने या मुद्यावर हरकत :-
दि. 25/06/2023 आणि दि. 28/11/2023 रोजी दिलेल्या नोटिसांनुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम 101 आणि 156 अंतर्गत संचालक मंडळाच्या मालमत्तेवर 'जप्ती/अटॅचमेंट आली आहे.
हे नानासाहेब सागरे महांकाली साखर कारखाना कामगार पतसंस्थेच्या थकबाकीच्या वसुलीबाबत झाले आहे.

४. गैरकारभारामुळे संस्था कर्ज बाजारी होवून संस्थेची मालमत्ता कर्जदार बँकेने कारवाई करुन लिलाव करुन ताब्यात घेतलेने संस्थेचा कारभार बंद पाडल्याने पुन्हा उमेदवारीस हरकत :-
संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तांवरही सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी ऋण वसुली न्यायाधिकरणाच्या आदेशाने जप्तीची कारवाई सुरू आहे.
बँकेने SARFAESI कायद्यानुसार कारवाई करून सोसायटीचा कारखाना परिसर, यंत्रसामग्री व उपकरणांचा ताबा घेतला आहे. अजूनही सुमारे 40 कोटी रुपये इतकी रक्कम विद्यमान संचालक मंडळाकडून वसूल करायची बाकी आहे.

५. सुचक व अनुमोदक संदर्भातील तांत्रिक त्रुटी :-
उमदेवाराच्या अर्जावरील सुचक व अनुमोदक हे कारखान्याचे वैद्य थकबाकीत रहीत तसेच क्रियाशिल सभासद नसलेने सदरचा नामनिर्देशनपत्र रद्द करणेत यावा.

६. कंत्राटदारी व हितसंबंधाचा मुद्दा :-
सदरील उमेदवार तसेच त्याचे कुटुंबीय व निकटचे नातेवांईक हे सदर संस्थे तर्फे चालवणेत येणाऱ्या साखर कारखान्याशी कंत्राटदार, पुरवठादार असलेने याही कारणास्तव सदरचा उमेदवारी अर्ज नामंजूर करणेत यावा.

७. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन नं. 2438/2025 अन्वये कोर्ट फी भरलेचा पुरावा :-



Scanned with OKEN Scanner

वर नमुद रिट पिटीशन मधील आदेशान्वये कोर्ट फी भरलेचा पुरावा अर्जासोबत सादर केला नसलेने सदरचा उमेदवारी अर्ज नामंजूर करणेत यावा.

८. पात्र नसलेल्या प्रवर्गातून तसेच परस्पर विरोधी प्रवर्गातून अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे सदरचा उमेदवारी अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

याशिवाय कायद्यानुसार जे इतर सर्वसाधारण मुद्दे हरकतीसाठी मांडता येतील, ते सर्व मुद्देही या हरकतीमध्ये समाविष्ट आहेत.

वरील जाबदार क्र. १ ते १९ यांनी खालीलप्रमाणे म्हणणे सादर केलेले आहे –

Hon'ble Bombay High Court (Circuit Bench at Kolhapur) have already in its order dt. 25.06.2026 in para (1) have clearly held that, the earlier order of rejection of nomination papers dt. 14.02.2025 passed by Returning Officer is set aside and the nomination papers of the petitioners therein i.e. the under signed contesting candidates are allowed.

That there were in all 20 petitioners in the said petition out of those one petitioner candidate Patil Jaysing Pandit is deceased, hence his nomination paper will have to be rejected.

The order of Hon'ble High Court in writ petition no. 2438/2025 in operative part of order para (1) reads as follows.

Rule is made absolute by quashing Judgment and order dt. 14.02.2025 passed by resp. no. 1 Returning Officer and hold in the nominations of the petitioners.

Hence, in our respectful submission, there is no question of scrutinizing our nomination papers again, as our nomination papers are already validated by Hon'ble High Court and as such our nomination papers may kindly be accepted and we may be declare validly nominated candidates.

That according to revised elections programme the stage is kept for scrutiny of nominations. The operative part of order of Hon'ble High Court in above writ petition para (3) reads as follows:

Para (3) The respondents nos.4, 6 to 87, whose nominations are rejected, shall not be entitled to receive the benefit of order passed today unless a court fees is paid and a proof thereof is submitted to the respondent / authorities.

In my respectful submission, now the scrutiny will be the above mentioned limited aspect only and that on no other ground scrutiny can be there.

That the objection is raised / mentioned that, our nomination papers should be rejected as we are defaulters of a Co. Op. society. That this aspect cannot be considered once the Hon'ble High Court have validated / unfolded our nomination papers. That there cannot be parts in the order, as to on which ground the nomination papers earlier were rejected and the Hon'ble High Court have considered said ground, i.e. the Hon'ble High Court have upholded our nominations only on a ground of non-supply of sugar cane and now another ground or objection can be raised and considered. In my respectful submission again scrutinizing our nomination papers on different ground of alleged default of Co- Op. society will be contempt of orders of Hon'ble High Court. Hence, the objection of alleged default cannot be entertained at this stage, as our nomination papers are already upholded by Hon'ble High Court.

It is our further submission, without accepting that now our nomination papers re-scrutinized on the ground of alleged default, our submission is Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana is registered under the provisions of The Multi State Co. Op. Societies Act. The this



Scanned with OKEN Scanner

qualifications for being a member of board of said Multi State Society are provided U/s. 43 of the said Act., Sec. 43 (1) (g) and (h) are relevant so far as default is concern. Sec .43 (1) (g) provides about purchasing goods on credit from the society and after receipt of notice if the dues are not paid the concern persons will be treated as defaulter. Were as sec. 43 (1) (h) provides about a person against whom any amount due under a decree, decision or order is pending recovery under this Act. (or any other Act specified in the third schedule). That in the third schedule in all 17 Acts are mentioned, wherein there is no mention of the Maharashtra State Co. Op. Societies Act.. Hence in our respectful submission, without admitting that we are defaulters of a Co- Op. society which is registered under the provisions of The Maharashtra Co. Op. Societies Act., we cannot be treated as defaulters for the purpose of sec. 43 of The Multi State Co. Op. Societies Act.,

For the above purpose we are relying on the Judgment of Hon'ble High Court, Bombay in the matter of Raju Kashinath Salunkhe V/s. The State of Maharashtra decided on 30th November 2021, wherein it is clearly held that a person defaulter under The Maharashtra Co. Op. Societies Act., will not be disqualified under either section 29 (d) or sec. 43 (1) (h) of The Multi State Co. Op. Societies Act., That only amendment in section 43 (1) (h) is added on 03.08.2023 which provides about " or any other Act specified in the third schedule". As mentioned about in the third schedule there is no mentioned of The Maharashtra Co. Op. Societies Act.,

We are not defaulters of any co-operative society register under Maharashtra Societies Act. Including Nanasaheb Sagare Mahankali Sakhar Karkhana Karymchari Sahakari Pat Sanstha Maryadit Rajarambapunagar Kavathe Mahankal Taluka Kavathe Mahankal Dist. Sangli.

Hence, it is humbly prayed that, considering above mentioned factual aspect, legal aspect and order passed by Hon'ble Bombay High Court, Circuit Bench, Kolhpaur in writ petition no. 2438/2025 on 25.06.2026 our nomination papers as they are already upholded our names may kindly be declared in the validly nominated candidates.

## -: मुद्दे :-

| अ.क्र. | मुद्दा |
|---|---|
| ०१ | मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम १०४(१) आणि कलम १०४(३) अंतर्गत तसेच कलम १२० च्या उल्लंघनाबाबत हरकत :- |
| ०२ | मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम ३९ च्या उल्लंघनाबाबत हरकत |
| ०३ | संस्थेचे सभासद असलेली नानासाहेब सगरे महांकाली साखर कारखाना पतसंस्था यांचे देणे थकविलेबाबत कारवाई झाली असलेने या मुद्यावर हरकत |
| ०४ | गैरकारभारामुळे संस्था कर्जबाजारी होऊन संस्थेची मालमत्ता कर्जदार बँकेने कारवाई करुन लिलाव करुन ताब्यात घेतलेने संस्थेचा कारभार बंद पडलेने पुन्हा उमेदवारीस हरकत |
| ०५ | सुचक व अनुमोदक संदर्भातील तांत्रिक त्रुटी |
| ०६ | कंत्राटदारी व हितसंबंधाचा मुद्दा |
| ०७ | माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन नं.२४३८/२०२५ अन्वये कोर्ट फी भरलेचा पुरावा |
| ०८ | पात्र नसलेल्या प्रवर्गातून तसेच परस्पर विरोधी प्रवर्गातून अर्ज दाखल केले आहेत |



Scanned with OKEN Scanner

मुद्दा क्र. १ ते ८ चे विश्लेषण व निष्कर्ष खालीलप्रमाणे –

**१. मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम १०४(१) आणि कलम १०४(३) अंतर्गत तसेच कलम १२० च्या उल्लंघनाबाबत हरकत :-**

दि. ०३.०९.२०२५ रोजीची केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था यांची नोटीस श्री.महांकाली सहकारी साखर कारखाना लि.कवठेमहांकाळ यांना दिलेबाबतची छायांकित प्रत तसेच त्याबाबतचे दि. २४.०३.२०२६ रोजीचे स्मरणपत्राची छायांकित प्रत अर्जदार यांनी छाननी वेळी सादर केलेली आहे.

वरील हरकतीच्या मुद्यांची पूर्तता केलेबाबत संबंधित कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांनी दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था यांना ई-मेल सादर केले आहे व त्याबाबतचा पुरावा छाननी दरम्यान सादर केला आहे. तथापि अर्जदार यांनी सदर अहवाल ऑनलाईन पोर्टलवर अपलोड केलेले नाही, असे तथ्ये उपस्थित केले आहे. तरी सदर वस्तुस्थितीमध्ये मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम १०४(१) आणि कलम १०४(३) अंतर्गत शास्तीची तरतूद आहे तसेच कलम १२० अंतर्गत वार्षिक विवरण पत्र सादर करणेबाबतची तरतूद आहे, अपात्रतेबाबत तरतूद नाही. उक्त नमूद कलम व अर्जदार यांनी सादर केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले असता केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत जाबदार क्र. १ ते १९ यांचेवर कोणत्याही कारवाईचे आदेश पारीत केलेबाबतचे पुरावा अर्जदार यांनी छाननी वेळी सादर केलेले नाही. तसेच मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ४३(२) नुसार केंद्रीय निबंधक यांनी सुनावणी घेऊन कार्यवाही केलेबाबत कोणताही आदेश / पुरावे हरकतदार यांनी सादर केलेले नाहीत. **मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियमातील कलम ४३(२) अन्वये सदर कलम केंद्रीय निबंधक यांनी सुनावणी घेऊन आत्मपक्ष सर्मथनाची संधी दिले नंतरच लागू होतात,** अशी तरतूद आहे. तस झाल्याचे कुठलाही पुरावा हरकत दारांनी सादर केलेला नाही.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

**२. मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम ३९ च्या उल्लंघनाबाबत हरकत :-**

सदर कारखान्याची मालमत्ताबाबत कारवाई ही सरफेसी कायद्यांर्गत झालेली असून मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम ३९ नुसार सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संचालक मंडळ यांनी वार्षिक सर्वसाधारणसभा घेण्याबाबत तरतूद नमूद आहे. तसेच कलम ३९(२) नुसार संचालक मंडळ सदर सभा विहित मुदतीत घेण्यास अपयशी झालेस केंद्रीय निबंधक यांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत ९० दिवसांच्या कालावधीमध्ये वार्षिक सभा घेण्याची तरतूद आहे. परंतू उक्त नमूद मुद्यांच्या अनुषंगाने मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ४३(२) नुसार केंद्रीय निबंधक यांनी सुनावणी घेऊन कार्यवाही केलेबाबत कोणताही आदेश / पुरावे हरकतदार यांनी सादर केलेले नाहीत. **मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियमातील कलम ४३(२) अन्वये सदर कलम केंद्रीय निबंधक यांनी सुनावणी घेऊन आत्मपक्ष सर्मथनाची संधी दिले नंतरच लागू होतात,** अशी तरतूद आहे. तस झाल्याचे कुठलाही पुरावा हरकत दारांनी सादर केलेला नाही.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

**३. संस्थेचे सभासद असलेली नानासाहेब सगरे महांकाली साखर कारखाना पतसंस्था यांचे देणे थकविलेबाबत कारवाई झाली असलेने या मुद्यावर हरकत :-**

विभागीय सह निबंधक सहकारी संस्था कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचेकडील दि. २१ मे २०२५ रोजी जाबदार क्र. १ श्री.राजेंद्र व्ही. माळी यांना निर्देश देणेत येत आहेत की, त्यांनी प्राधान्याने जाबदार क्र.



Scanned with OKEN Scanner

३ श्री.महांकाली सहकारी साखर कारखाना लि.कवठेमहांकाळ या मिळकतीची विक्री करुन जाबदार क्र. २ नानासाहेब सगरे महांकाली सहकारी साखर कारखाना कर्मचारी पतसंस्था लि.कवठेमहांकाळ या संस्थेची थकित रक्कम वसूल करावी आणि संपूर्ण थकित रक्कम वसूल न झालेस उर्वरित रक्कमेसाठी अर्जदार यांची मिळकत विक्री करुन रक्कम वसूल करावे, असे आदेश पारित केलेले आहे. या अनुषंगाने त्याच्यानंतर थकित रक्कम वसूलीबाबत सदर कारखान्याची मिळकत विक्री करुन थकित रक्कम वसूल होते किंवा कसे ? याबाबत अर्जदार यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही, किंबहुना कारखान्याच्या मिळकतीची विक्री करुन वसूली करणेबाबत पुढील कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. तसेच प्रलंबित वसुलीची कोणतीही जबाबदारी जाबदार यांचेवर असलेबाबत स्पष्टता देखील येत नाही किंबहुना सदर बोजा मुलत: कारखान्यावर असल्याची प्रथमदर्शी दिसून येते आणि मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम ४३(१) g नुसार सभासदांनी कर्ज घेणे, कारखान्याकडून उधारीवर वस्तू खरेदी करणे किंवा सदर कारखान्याचे देणे लागणे याबाबत तरतूद आहे. सदर प्रकरणी वरील विषयाबाबत जाबदार यांच्या अपात्रतेबद्दल अर्जदार हे या कार्यालयाची खात्री पटवू शकले नाही.

**तरी मा.उच्च न्यायालय यांचेकडील रिट पिटीशन नं. ८०१८/२०२१ श्री.राजू काशिनाथ साळूंखे वि. महाराष्ट्र शासन वगैरे मधील न्यायनिर्णयामध्ये खालीलबाब नमूद आहे.**

"3. These are admittedly annexed to the Petition, three recovery certificates under section 101 of the Societies Act, 2002 disqualifies as Maharashtra Co-operative Societies Act, 1960. These are not issued under Multi State Co-operative made any default in payment of any amount to be paid to the Multi State Co-operative Society under person from being eligible to be a member of a Multi-State Co-operative Society if inter alia he has the bye-laws of such society. Section 43(1)(h) says that no member of the Multi State Co-operative Society is eligible to be chosen as a member of the board of such a society if that person is one against whom any amount due under a decree, decision or order is "pending recovery under this Act.

4. Mr. Hakani for Respondent Nos 2 and 4 is correct in saying that disqualification under Section 43 is not for a general pendency of recovery under any Act but only where recovery proceedings are pending under the Multi State Co-operative Societies Act (not under any Act).

5. There are no such pending recovery proceedings in respect of any decree, decision or order against the 4th Respondent under the Multi State Co-operative Societies Act."

सदर कारखाना बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ खाली नोंदणीकृत आहे. सदर न्यायनिर्णयानुसार कलम ४३ खाली फक्त बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ खाली किंवा सदर कायद्यातील अनुसूची ३ मध्ये नमूद कायद्यांगत वसूली असेल तरच अपात्रतेसाठी पात्र ठरतात. सदर प्रकरणी बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ किंवा अनुसूची ३ मधील नमूद कायद्यांगत वसूली दिसून येत नाही. सबब जाबदार क्र. १ ते १९ अपात्र होत नाहीत.

**मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडील सिव्हील अपिल नं. २०९३ व २०९४/१९६८ Co-Operative Central Bank LTD. And Orts. V/s Additional Industrial Tribunal and Orts. मधील न्यायनिर्णयामध्ये खालीलबाब नमूद आहे.**



Scanned with OKEN Scanner

**"D. Co-operative Societies - Bye-laws - Legal nature Bye-laws of a co-operative society framed under the Act govern internal management, business, or administration - They bind the society and its employees like conditions of service in a contract but do not have the force of law or statute, unlike statutory rules or Standing Orders certified under the Industrial Employment (Standing Orders) Act.**

2. The Tribunal, and the High Court, in rejecting the plea taken on behalf of the Banks, expressed the view that the disputes actually referred to the Tribunal were not capable of being decided by the Registrar of the Co-operative Societies u/s 61 of the Act and, consequently, the reference to the Industrial Tribunal under the Industrial Disputes Act was competent. Learned counsel appearing on behalf of the Banks took us through the provisions of the Act to indicate that, **besides being a local and special Act, it is a self-contained Act enacted for the purpose of successful working of Co-operative Societies, including Co-operative Banks, and there are provisions in the Act which clearly exclude the applicability of other laws if they happen to be in conflict with the provisions of the Act."**

वरील न्यायनिर्णयानुसार सदर प्रकरणी बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ च्या अनुषंगाने विचार करणे क्रमप्राप्त ठरतात.

मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ कलम ४३(१)(H) अंतर्गत खालीलबाब नमूद आहे –

**(h) Is a person against whom any amount due under a decree, decision or order is pending recovery under this Act[1][or any other Act specified in the Third Schedule**

अर्जदार यांचेकडून सादर केलेल्या कागदपत्रानुसार वरील जाबदार क्र. १ ते १९ हे सदर संस्थचे वैयक्तिक कर्जदार नाहीत.

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील शेड्यूल ३ मध्ये नमूद कोणत्याही कायद्याखाली त्यांचे कर्ज दिसून येत नाही.

सबब सदर प्रकरणी जाबदार यांच्या अपात्रतेबद्दल अर्जदार हे या कार्यालयाची खात्री पटवू शकले नाही.

**४. गैरकारभारामुळे संस्था कर्जबाजारी होऊन संस्थेची मालमत्ता कर्जदार बँकेने कारवाई करुन लिलाव करुन ताब्यात घेतलेने संस्थेचा कारभार बंद पडलेने पुन्हा उमेदवारीस हरकत :-**

सदर कारखान्याची मालमत्ताबाबंत कारवाई ही सरफेसी कायद्यांगत झालेली असून मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत अपात्रतेबाबत कोणतीही तरतूद नाही.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

**५. सुचक व अनुमोदक संदर्भातील तांत्रिक त्रुटी :-**

याबाबत अर्जदार यांनी कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. **श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि.कवठेमहांकाळ यांचेकडील स्वीकृत पोटनियमांन्वये आणि बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील कलम ४३(१) g अन्वये सुचक व अनुमोदक (सभासद) यांचेवर थकबाकी असेल तर कारखान्यांनी त्यांना नोटीस देऊनही, विहीत मुदतीत संबंधितांनी ती थकबाकी भरले नाही त्यांचेनंतरच त्यांची सदस्यत्व कारखाना रद्द करु शकतात आणि त्यांचे उमेदवारी रद्द होतात,** तरी थकबाकीदार असल्याने कारखान्याने त्यांना नोटीस बजावले किंवा त्यांची सभासदस्यत्व रद्द केलेची कार्यवाही केलेबाबत कोणतेही पुरावे अर्जदार यांनी सादर केलेले नाहीत.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

६. **कंत्राटदारी व हितसंबंधाचा मुद्दा :-**

अर्जदार यांनी सादर केलेले पुरावे याचे अवलोकन केले असता श्री.शंतनू विजय सगरे यांनी SHRIMAHANKALI AGRO AND SUGAR PROCESSORS PRIVATE LIMITED ही कंपनी स्थापन केलेली आहे व त्यामधून कलम ३९(A)(१) मधील क्लॉज f नुसार Conflict of Interest निर्माण होत असलेबाबत आक्षेप नमूद केला आहे. हरकतदारांनी सादर केलेले कागदपत्र पाहिले असता सदर कंपनी ही आजतागायत प्रत्यक्ष कार्यरत असल्याचे दिसून येत नाही. फक्त सन २०२० मध्ये त्याचे रजिस्ट्रेशन असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते तसेच सदर कंपनीचे सन २०२० पासून आजतागायत कोणतेही व्यवहार झाले असलेचे पुरावे अर्जदार यांनी सादर केलेले नाही. त्यामूळे श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि.कवठेमहांकाळ यांचेकडील स्वीकृत पोटनियमांन्वये कलम १४(a) मध्ये नमूद केलेला Conflict or competitive with the business of the society हा मुद्दा खात्रीपूर्वक हरकतदार यांनी सिध्द करु शकले नाही.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

७. **माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन नं.२४३८/२०२५ अन्वये कोर्ट फी भरलेचा पुरावा :-**

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ कोल्हापूर यांचेकडील रिट पिटीशन नं. २४३८/२०२५ मधील आदेशामधील क्र. ३ नुसार **प्रतिवादी क्र. ४, ६ ते ८७ हे न्यायालयीन शुल्क भरुन त्याचा पुरावा सादर करीत नाहीत तोपर्यंत त्यांना पारित केलेल्या आदेशाचा लाभ मिळणार नाही, असे नमूद केले आहे. तसेच जाबदार क्र. १ ते १९ हे सदर याचिकेत पिटीशनर असलेने त्यांना सदर मुद्दा लागू होत नाही.**

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

८. **पात्र नसलेल्या प्रवर्गातून तसेच परस्पर विरोधी प्रवर्गातून अर्ज दाखल केले आहेत :-**

याबाबत अर्जदार यांनी कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही तसेच छाननी वेळी याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही.

सबब हरकतदार यांनी घेतलेली हरकत मान्य करता येणार नाही.

## -: हरकतीचे मुद्दे :-

| अ.क्र | उपस्थित केलेले हरकतीचे मुद्दे | उमेदवारी अपात्रता शाबित होते / नाही |
|---|---|---|
| ०१ | मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम १०४(१) आणि कलम १०४(३) अंतर्गत तसेच कलम १२० च्या उल्लंघनाबाबत हरकत :- | नाही |
| ०२ | मल्टिस्टेट सहकारी संस्था अधिनियम २००२ च्या कलम ३९ च्या उल्लंघनाबाबत हरकत | नाही |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ०३ | संस्थेचे सभासद असलेली नानासाहेब सगरे महांकाली साखर कारखाना पतसंस्था यांचे देणे थकविलेबाबत कारवाई झाली असलेने या मुद्यावर हरकत | नाही |
| ०४ | गैरकारभारामुळे संस्था कर्जबाजारी होऊन संस्थेची मालमत्ता कर्जदार बँकेने कारवाई करुन लिलाव करुन ताब्यात घेतलेने संस्थेचा कारभार बंद पडलेने पुन्हा उमेदवारीस हरकत | नाही |
| ०५ | सुचक व अनुमोदक संदर्भातील तांत्रिक त्रुटी | नाही |
| ०६ | कंत्राटदारी व हितसंबंधाचा मुद्दा | नाही |
| ०७ | माननीय मुंबई उच्च न्यायालयांच्या रिट पिटीशन नं.२४३८/२०२५ अन्वये कोर्ट फी भरलेचा पुरावा | नाही |
| ०८ | पात्र नसलेल्या प्रवर्गातून तसेच परस्पर विरोधी प्रवर्गातून अर्ज दाखल केले आहेत | नाही |

## -: आदेश :-

वरील सर्व बाबींचे अवलोकन करुन, मी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजाराम बापू नगर कवठे महांकाळ, मला प्राप्त झाले अधिकारानुसार व प्रस्तुत प्रकरणांतील कागदपत्रांचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

१. **अर्जदार यांनी सादर केलेले एकूण १९ उमेदवारांच्या अपात्रतेबाबतचा अर्ज अमान्य करण्यात येत आहे.**
२. **खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.**

ठिकाण - सांगली
दिनांक - २१/०८/२०२६

Mainak

**(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि.**
**राजाराम बापू नगर कवठे महांकाळ तथा**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सांगली**



Scanned with OKEN Scanner

# निवडणूक निर्णय अधिकारी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठेमहंकाळ, ता. कवठेमहंकाळ, जि. सांगली यांचे कार्यालय द्वारा विशेष लेखापरिक्षक वर्ग १ सहकारी संस्था (साखर), सांगली

२०४, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विजयनगर, सांगली मिरज रोड सांगली
E-mail ID- spladt.sugsangli१@gmail.com

**वाचले -**

१) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ व त्या खालील नियम,
२) मा.सहकार निवडणुक प्राधिकरण, सहकार मंत्रालय, दिल्ली यांचेकडील दि.३०/०७/२०२६ रोजीचा मंजूर निवडणुक कार्यक्रम
३) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ कोल्हापूर यांचेकडील रिट पिटीशन नं. २४३८/२०२५ मधील आदेशामधील क्र. ३ नुसार जाबदार क्र. १ ते १९ हे सदर याचिकेत पिटीशनर असलेने त्यांना सदर मुद्दा लागू होत नाही.

ज्या अर्थी उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ कोल्हापूर यांचेकडील रिट पिटीशन नं. २४३८/२०२५ आदेशानुसार कोर्ट फी भरणा करुन त्याबाबतचा पुरावा निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक होते, तथापि खालील नमूद उमेदवारांनी कोर्ट फी भरुन त्याबाबतचा पुरावा सादर केलेला नाही.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | मतदार संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | जाधव अवधुत तुकाराम | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २ | माने दादासो श्रीरंग | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३ | गिडडे/निकम बबन मारुती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ४ | पवार जयवंत विठ्ठल | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ५ | कोळेकर अमित आप्पासो | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ६ | शेळके किसन नामदेव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ७ | माने तानाजी शंकर (भाऊ) | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ८ | आमुने बाळू भिमराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ९ | कारची अरविंद आडवेश | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १० | पाटील जनार्दन एकनाथ | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ११ | करांडे वसंत निवृत्ती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १२ | शिरोळकर बद्रुद्दीन अब्दुलहमीद | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १३ | सगरे उमेश चंद्रकांत | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १४ | कदम प्रशांत नामदेव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १५ | वाघमारे नामदेव बाबू | उत्पादक सभासद अनुसुचीत जाती /अनुसुचीत जमाती मतदारसंघ |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १६ | लोंढे अनिल विष्णु | उत्पादक सभासद अनुसूचीत जाती /अनुसूचीत जमाती मतदारसंघ |

## -: आदेश :-

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ कोल्हापूर यांचेकडील आदेशाचे अवलोकन करता, मी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजाराम बापू नगर कवठे महांकाळ, मला प्राप्त झाले अधिकारानुसार वर नमूद अनुक्रमांक १ ते १६ मधील उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविण्यात येत आहे.

ठिकाण - सांगली

दिनांक - २१/०८/२०२६

Returning Officer
Rajarambapunagar, Kavathe Mahankal 2024-2029
Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd.

(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.
निवडणूक निर्णय अधिकारी
श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि.
राजाराम बापू नगर कवठे महांकाळ तथा
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सांगली

Scanned with OKEN Scanner